# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.02.2026** **वार- गुरुवार**

---

**<u>सावरकर पुण्यतिथी</u>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाज माध्यमावरच्या संदेशाद्वारे वीर सावरकरांना अभिवादन केलं आहे.
महापौर मंजूषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज पुण्यातल्या डेक्कन परिसरातील सावरकर स्मारक स्थळी जाऊन त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. विविध संस्था संघटनांच्या वतीनं व्याख्यानं, सांगीतिक कार्यक्रम, अभिवाचन, नाट्य सादरीकारण अशा विविध कार्यक्रमातून सावरकर विचारांचं स्मरण केलं जात आहे.
पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या वसतीगृहातील ज्या खोलीत स्वातंत्र्यवीर सावरकर यांचं वास्तव्य होतं, ती खोली आज खुली करण्यात आली आहे, या ठिकाणी सावरकरांना अभिवादन करण्यासाठी अनेक नागरिकांनी आज गर्दी केली होती.

**<u>सीआयडी</u>**

बारामती विमान दुर्घटनेच्या तपासाबाबत महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभागाने आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. या प्रकरणाचा तपास अत्यंत सखोल आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने केला जात आहे. हा अपघात घातपात होता का? किंवा निष्काळजीपणामुळे अपघात घडला का, याचा तपास करण्यावर गुन्हे अन्वेषण विभागाचा भर असेल, असं अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनील रामानंद यांनी सांगितलं.
AAIB म्हणजेच विमान अपघात अन्वेषण विभागाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील निष्कर्ष सीआयडीच्या तपासात समाविष्ट केले जातील, असंही रामानंद यांनी सांगितलं. या प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन, याचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागामार्फत करण्याची विनंती राज्य सरकारने केंद्र सरकारकडे केली असल्याचं त्यांनी सांगितलं. २८ जानेवारी रोजी बारामती इथं झालेल्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह चौघांचा मृत्यू झाला होता.

**<u>सिद्धार्थ शिरोळे</u>**

अन्नपदार्थ ऑनलाइन पद्धतीने पुरविणाऱ्या कंपन्यांच्या गोदामांची तातडीने विशेष तपासणी करण्यात यावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत केली. या संदर्भात राज्यातील आमदारांच्या बैठका घेऊ; आणि उपाय योजनांबाबत विचार करू, केंद्र सरकारचीही यात मदत घेऊ, असं आश्वासन अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी दिलं. रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी पुणे-मुंबई, पुणे-बेंगळुरू, पुणे-हैदराबाद या तीन हायस्पीड रेल्वे कॉरिडॉरसाठी मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावं असं आवाहनही आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी केलं आहे.

**<u>Pcmc</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समिती अध्यक्ष पदासाठी भारतीय जनता पक्षाकडून अभिषेक बारणे यांचा एकमेव अर्ज दाखल झाला आहे. येत्या शनिवारी स्थायी समिती अध्यक्षांची घोषणा होणार आहे.

**पुणेमनपा**

पुणे शहरात नव्याने केलेले रस्ते पुन्हा पुन्हा खोदले जाऊ नयेत, यासाठी आता रस्त्यांच्या कामांबरोबरच सांडपाण्याचे पाईप, पावसाळी गटारे आणि केबलची कामं एकत्रितच करण्याचा निर्णय महानगरपालिकेनं घेतला आहे. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी. यांनी आज ही माहिती दिली. नव्या नियोजनामुळे खर्चाची बचत होऊन रस्ते अधिक टिकाऊ आणि सर्वसुविधांनी सुसज्ज राहतील, असा विश्वास पृथ्वीराज बीपी यांनी व्यक्त केला.

**भीमाशंकर**

पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर इथल्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आहे. या ठिकाणी सुमारे पावणे तीन हजार चौरस फुटांच्या सभा मंडपाचं काम केवळ चार महिन्यांत केलं जाणार आहे, हे काम करताना पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाचं जीर्णोद्धाराचं काम पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात येणार आहे. संपूर्ण दगडातील या बांधकामाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्याचा पुणे जिल्हा प्रशासनाचा प्रयत्न आहे. त्यासाठी लवकरच सल्लागाराची नेमणूक करण्यात येणार असल्याचं जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितलं.

**पुणे जिल्हापरिषद**

राज्यस्तरीय शैक्षणिक मूल्यमापनात पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांनी राज्यात अव्वल स्थान मिळवलं आहे. आगामी काळातही जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असं मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी म्हटलं आहे.

**सर्वोच्च न्यायालय**

पुण्यातल्या पोर्श अपघात प्रकरणी अल्पवयीन आरोपीचे वडील, विशाल अग्रवाल यांचा अंतरिम जामीन अर्ज आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळला. पुण्यात १९ मे २०२४ ला झालेल्या पोर्श अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला होता. ही गाडी चालवणाऱ्या अल्पवयीन मुलाच्या रक्त चाचणी अहवालात फेरफार केल्याचा आरोप विशाल अग्रवाल यांच्यावर ठेवला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल 33 आणि किमान 14 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नाही.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**